KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# केशवसुत यांच्या कवितेतील काव्यविचार

**प्रा. गणपती जोतीबा मोरे**
मराठी विभाग प्रमुख
स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी
जि. परभणी
मो. न. ७४४७३०७८१२

कवितेचे स्वरूप तिचे प्रयोजन काय? तिचे सामाजिक महत्व या व अशाच अनुषंगीक प्रश्नाबद्दल आजपर्यंत कमी अभ्यास झालेला आहे असे नाही. हा अभ्यास संस्कृत साहित्यशास्त्रास वेळेपासून होत आहे व आजही होत आहे. हा अभ्यास जितका होईल तितका चांगलाच माय जेनेकरून निव्वळ धूळ न उडता कवितेच्या स्वरूपाचे समग्र दर्शन होईल. अशी काव्यचर्चा येथाचीत आढळून येते. कधी कवितेकडे मनोरंजनाच्या दृष्टीने पाहिले जाते तर कधी एखादे तत्व लोकांच्या गळी उतरविण्यासाठी तिचा दृष्टांतासारखा उपयोग केला जातो. तर कधी एखादी विचारसरणीच्या प्रसारासाठी तिला राबवून घेतले जाते. ही कामे काही कवितेला अवजड किंवा आवक्याबाहेरची नाहीत. मात्र तिची त-हा वेगळी आहे. हे अभिनिवेशी टीकाकारांच्या लक्ष्यात येत नाहीत. काव्य हे जिवंत जाणिवेच्या अभिव्यक्तीचे एक साधन आहे व म्हणून त्यामध्ये वैयक्तिक व सामाजिक वृत्तीचे, भावनांचे, विचारांचे स्पंदन स्फुरल्याशिवाय राहणे अशक्य आहे. इतकेच नव्हे तर, सामाजिक जीवन प्रभावी व गतिमान करण्याची किंवा तितकेच निष्क्रीय व परागतिशील करण्याची शक्तीही त्यामध्ये आहे. ही शक्ती ओळखून तिचा उपयोग करणा-या अभ्यासकांची अथवा अशा व्यक्तींची मात्र वाणवा आहे. कवितेच्या स्वरूपाविषयी समग्र विचार करायचा असेल तर अभ्यासकांनी तिच्या निर्मात्याच्या व्यक्तित्वाच जाणीव मनात बाळगायला हवी आणि या संबंधात कविच्या परिस्थितीचा, भावना-आकांक्षांचा व्यवहारिक जीवनाचा जसा विचार व्हायला पाहिजे, तसेच त्याची काव्यविषयकदृष्टी काय होती हेही विशेष कटाक्षाने पाहायला हवे. या दृष्टीने या लेखात केशवसुत यांच्या कवितेतून व्यक्त होणा-या काव्यविचारांचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे.

'जसे व्यक्तित्व तसी त्यांची काव्यशैली' असे म्हटले जाते. याचाच अर्थ असा की, कवितेवर निर्मात्या कवीच्या व्यक्तित्वाची स्पष्ट छाप पडलेली असते. म्हणून त्यांच्या कवितेचा समग्र अभ्यास करण्यासाठी त्या कविच्या व्यक्तित्वाचा किंवा कवितेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण तपासवा लागते. अर्थात कुसुमावती देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे, ''कोणत्याही व्यक्तीच्या प्रतिभेचे स्वरूप व विकास

निव्वळ स्वयंनिर्मित असू शकत नाही. ती व्यक्ती साहित्यीक प्रकारांचा आश्रय घेते. हे बरेचशे परिस्थितीवर व त्या काळच्या वैचारिक वातावरणावर अवलंबून असते. तसेच त्या निर्मितीतील साधारणवृत्ती कशी असेल सरल, स्वप्नमय, प्रगतिशील का वुर्दम्य ध्येयवादी, वास्तवाची जाणीव ठेवणारी इत्यादी गोष्टीही काही अंशी परिस्थितीवर अवलंबून असतात."[१]

केशवसुतांनी इंग्रजी वळणाची आत्मनिष्ठ मराठी कविता लिहीली त्यामुळे त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हटले जाते. जुनी मराठी कविता ही वर्णनात्मक दीर्घ अशी कथा प्रवचनकारांच्या हरिदास, किर्तनकारांच्या व्दारे लोकापर्यंत पोहचली जात असे. ज्ञानेश्वरांची कविता श्रोते पुढे आहेत त्याच्यासमोर त्यांनी ती वाचली. ती कविता धर्मपरायण व पारलौकिक जीवनाचा विचार करणारी अशी होती. श्रोत्याचा विचार करणारी किंवा त्यांचे अस्तित्व समोर ठेवून ती लिहिली जात असे मात्र केशवसुत यांनी 'करूनिया काव्य जगात आणणे। न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणे।। करूनि ते दंग मनात गुंगले। तदीय हा सुंदर हेतु मी म्हणे। अशी काव्यलेखनाची भूमिका त्यांची होती. त्यामुळे केशवसुताच्या वेळेपासून मात्र मराठी कवितेचे हे लोकाभिमुख वळण सर्वस्वी नष्ट झाले. आधुनिक मराठी कविता आणि केशवसूत यांच्या प्रकृतीतील एका विशिष्ट बाबतीत समानशीलत्व मात्र विशेष करून नमूद करण्यासारखे आहे. आधुनिक मराठी कवितेच्या लोकविन्मूख वृत्तीशी सदृश्य आणि समांतर अशी वृत्ती केशवसुतांच्या व्यक्तित्वात त्यांच्या जीवनचरित्राचे केवळ वरवर आलोचन केले असता सहजच प्रतित होते.

केशवसुतांचे वडील बंधू श्री सी. के. दामले सांगतात. "बाळपणी एककदर्श, एकलकोंडया, मुग्ध आणि मुखदुर्बल वृत्तीचे होते."[२] हा त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव त्यांच्या कवितेवर पडलेला दिसून येतो. ऐकदा त्यांच्या नातेवाईकांनी मिळून फोटो काढल्याचे ठरविले. आपल्याला काय करायचे फोटो काढून? असे काहीशे म्हणून ते त्यात सामील झाले नाहीत. आपली ही उदासीनता क्षणभर सहभागी होण्याइतका दिल्दारपणा ते दाखवू शकले नाही. हया त्यांच्या उदासीनवृत्तीचाही प्रभाव त्यांच्या कवितेवर परि मळ भाळी ढग अश्रूंचा हया! डवरलाहे असे ते लिहीतात. केशवसुतांनी कवितेबद्दलच्या आपल्या वृत्ती विषयी काव्यात बरेच लिहीले आहे. त्यांच्या १२० कवितापैकी २० कविता विषयक आहेत. 'स्फुर्ति,' 'झपुडी,' व 'हरपले श्रेय,' यासारख्या कवितातून त्यांचा काव्यविषयक दृष्टीकोन दिसून येतो. कवितेचे प्रयोजन तिचे सामर्थ्य याविषयी केशवसुतांनी कवितेतून लिहीले आहे. कवी हे देवाचे लाडके आहेत. देवाने कवीला खेळण्यासाठी हे अंगण दिले आहे. कवी हा दिक्कालातून पाहू शकतो अशा कवी आणि कविता यांच्या सामर्थ्याविषयी त्यांचा पूर्ण विश्वास आढळून येतो. स्फुर्ति या कवितेत –

"पद्यपंक्तीची तरफ आमच्या करी विधीने दिली असे
टेकूनि ती जनताशीर्षावरी जग उलथूनिया देऊ कसे"

कवितेच्या सामर्थ्यामुळे जगाचा विकास किंवा -हास करण्याचे सामर्थ्य ती मध्ये असते.

साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे. जीवनातील साध्या साध्या विषयात मोठा आशय पाहाण्याची अलौकीकदृष्टी कवि प्रतिभेमध्ये असते असा रोमांचित आशय तितक्याच साध्या शब्दांतून आणि दैनंदिन जीवनातील प्रसंगावरून दिसते. कवी आणि कविता या कवितेतून युवा जैसा युवतीस मोहे तसा कवी हा कवितेस पाहे कवितेकडे ते प्रियशीच्या दृष्टीकोणातून पाहतात अशा रितीने ते कवितेकडे आणि जीवनाकडे मनःपूर्वकतेचे अभिव्यक्त करतात.

**समारोप -**

कवी आणि त्यांचे व्यक्तित्व हे अभिन्न असतात. कविच्या कवितेवर त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. हे व्यक्तित्व जन्मावर काही अंशी अवलंबून असते तसेच ते भोवतालचे सामाजिक आणि साहित्य विषयक वातावरण आणि वैचारिक जडणघडण यावरही अवलंबून असते. हे केशव सुताच्या कवितेचा अभ्यास केल्यावर तर जास्तच प्रतित होतांना दिसून येते. केशव सुतांनी कवितेचे प्रयोजन तिचे कार्य तसेच प्रतिभेचे सामर्थ्य यावर लिहीले आहे. प्रतिभा हा देवी प्रसाद आहे तो त्याला प्राप्त होतो त्याला दिक्कालातून दिसते. साध्या विषयात मोठा आशय त्याला दिसतो. कविता ही समाज काळ आणि परिस्थिला बदलू शकते किंवा बिघडवूही शकते. अशा प्रकारे केशव सुतांनी आपला काव्यविषयक विचार मांडलेला दिसून येतो.

**संदर्भ –**

१) देशपांडे कुसुमावती, पासंग, मोघे प्रकाशन गृह, मुंबई सहावी आवृत्ती. पृ.क्र.२०-२१

२) देशपांडे अ. वा. आ. म. वा. इ. भाग १ ला व्हिनस प्रकाशन